VANAMATI
वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था,नागपूर
VIP रोड,धरमपेठ,नागपूर-४४००१०
फोन नं- ०७१२-२५५५९९९/२५४३२१० E mail- sameti123@yahoo.co.in

जा.क्र./वनामती/कृषिदिन /१०७५/प्रशि/ /२०२३ दि. १६ /०५ /२०२३

## स्वारस्य प्रस्ताव (EOI) मागविण्यासाठी सूचना

वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (वनामती), नागपूर व प्रादेशिक कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था-रामेती(नागपूर,अमरावती,छत्रपती संभाजीनगर, नाशिक, पुणे,कोल्हापूरव खोपोली ) या प्रशिक्षण संस्थांमार्फत कृषि व संलग्न विभागाचे अधिकारी/कर्मचा-यांचे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येतात.

वनामती नागपूर येथे दि. १ जुलै २०२३ रोजी " कृषी दिन समारोह" आयोजीत करणे प्रस्तावित आहे.या समारंभाचे निमित्याने वनामती नागपूर संस्थेचे १) Coffee Table Book,२) वनामती व सर्व रामेती संस्थांवर माहितीपट तसेच ३)वनामतीचे वार्षिक प्रशिक्षण विशेषांक तयार करण्याचा मानस आहे.याकरिता आवश्यक लेखन साहित्य वनामती व रामेतीस्तरांवरूवन उपलब्ध करून देण्यात येइल परंतु याव्यतिरिक्त आवश्यक असलेले फोटो व व्हिडिओ इत्यादी सेवा पुरवठादारांनी संबंधीत संस्थेमध्ये प्रत्यक्ष भेट देवून तयार करावयाचे आहे.तसेच इच्छुक सेवा पुरवठादारांना या प्रकारच्या किमान ३ शासकीय प्रकल्पांचा अनुभव असणे अनिवार्य आहे.

(EOI)चा विहित नमुना व Concept Note कृषि विभाग म.रा.च्या संकेतस्थळ https://krishi.maharashtra.gov.in वर नवीन घडामोडी/Home page या टॅबखाली प्रसिध्द करण्यात आलेली आहे. इच्छुक सेवा पुरवठादारांनी आपले स्वारस्य प्रस्ताव सादरीकरणासह (PPT) दि. २३/०५/२०२३ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत वनामती संस्थेच्या vanamati.trg@gmail.com या ई-मेल वर सादर करावे.

सहपत्र :- Annexure – 1, 2

अपर संचालक
वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार
व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नागपूर

**Annexure – 1**

## स्वारस्य प्रस्ताव (EOI) चा नमुना

१. विक्रेत्याची (Vendor) मूलभूत माहिती

i. नाव
ii. फोन नंबर
iii. ईमेल पत्ता
iv. कंपनीचा स्थानिक पत्ता पिन कोड सह
v. कंपनीचे अधिकृत वेबसाईट असल्यास
vi. प्रस्ताव सादर करण्याची तारीख (Submission Date)

२. स्वत:बद्दल थोडक्यात परिचय

(पूर्वीचा अनुभव, कामाचा नमुना, संबंधित कौशल्य व आवश्यक असल्यास जोडण्यात येणारी इतर माहिती)

३. प्रकल्पाची वेळेबाबत तात्पुरती चौकट (Time limit)

( तुम्ही प्रकल्प कसा पूर्ण कराल त्यात समाविष्ट असलेले टप्पे रब ड्राफ्ट टेम्प्लेट प्रकल्पाची स्टेजवर कालमर्यादा याविषयी तपशीलवार माहिती द्यावी )

- प्रकल्प प्रस्तावाचे तपशीलवार पावर पॉइंट प्रेझेंटेशन (PPT)

४ या प्रकारच्या किमान ३ शासकीय प्रकल्पांचा अनुभव

उपरोक्त प्रमाणे परिपूर्ण स्वारस्य प्रस्ताव (EOI) (विहित मुदतीत प्राप्त झाल्यानंतर निवड समिती तुमच्या EOI प्रस्तावाचे खालील बाबींचे आधारे मुल्यमापन करेल

1) कामाची गुणवत्ता
2) Coffee Table Book,माहितीपट तसेच वार्षिक विशेषांक या प्रकारच्या किमान ३ शासकीय प्रकल्पांचा अनुभव
3) वनामती,नागपूर व राज्यातील ७ रामेती संस्थांशी(नागपूर,अमरावती,छत्रपती संभाजीनगर, नाशिक, पुणे,कोल्हापूरव खोपोली ) स्थानिकपातळीवर जाऊन समन्वय साधण्याची क्षमता

समितिच्या मूल्यमापनाच्या आधारे, निवड केलेल्या इच्छुक सेवा पुरवठादारांना सुचित केले जाईल. तदनंतर वनामती नागपूर कार्यालयातील निवड समिती समोर सादरीकरण करणे आवश्यक राहील.उपरोक्त मुल्यमापनाच्या एकत्रीत कार्यवाही नंतर दरपत्रके मागविण्याची कार्यवाही करण्यात येईल.

या सर्व कार्यपद्धतीमध्ये निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.या प्रकरणातील कोणतेही धोरण बदल अथवा निर्णय घेण्याचे अधिकार संचालक, वनामती नागपूर यांचेकडे राखून ठेवलेले आहेत.

दिनांक : १६/०५/२०२३

अपर संचालक
वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार
व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नागपूर

# Annexure 2

दिनांक -एक जुलै २०२३ रोजी कै.वसंतराव नाईक यांचा जन्मदिन कृषिदिन म्हणून साजरा करण्यात येणार असून वनामती नागपूर ही संस्था या पर्वावर माहितीपट व वाचन साहित्य प्रसारित करण्याचा मानस करत आहे.यामध्ये Coffee Table Book, माहितीपट/ व्हिडिओ व वार्षीक प्रशिक्षण विशेषांक यांचा समावेश असेल.

## 1) VANAMATI Coffee Table Book

वनामती नागपूर तसेच राज्यातील सर्व ७ रामेती संस्थाचे मार्फत घेण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाची वैशिट्यपुर्ण क्षणचित्रांची माहिती Coffee Table Book(वनामती संस्थेची क्षणचित्रे) च्या स्वरूपात प्रसिद्ध करू इच्छितं.यामध्ये मागील दोन वर्षात वनामती व सर्व रामेती संस्था(नागपूर,अमरावती,छत्रपती संभाजीनगर, नाशिक, पुणे,कोल्हापूरव खोपोली )मार्फत झालेल्या विविध प्रशिक्षणांतील वैशिष्ट्यपूर्ण /महत्वपुर्ण माहिती निवडक छायाचित्रांचे माध्यमातून मांडण्यात येइल.

- Cofee Table Book (वनामती संस्थेची क्षणचित्रे) अंदाजे ५०-६० पृष्ठांचे असेल.
- या वाचन साहित्याच्या किमान १०० प्रति छापण्याचा संस्थेचा मानस आहे.
- या करता आवश्यक लेखी साहित्य वनामती संस्थेमार्फत उपलब्ध करून देण्यात येईल.
- या साहित्याचे निर्मितीकरिता लेखी साहित्याचे व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकारचे सहाय्य केले जाणार नाही.
- याकरिता आवश्यक असलेले फोटो व व्हिडिओ इत्यादी सेवा पुरवठादारांनी संबंधीत संस्थेमध्ये प्रत्यक्ष भेट देवून तयार करावयाचे आहे.
- Technical Specifications
  - a) Paper Size- A4
  - b) Cover Page –(Jacket)- 4 (170 GSM Matt Lamination)
  - c) Inner Page – 46 - 56 + End paper (170 GSM Matt art paper
  - d) Page Laminated Cover (PLC) 4 (130 GSM Matt Lamination)
  - e) Colour Text 4 + 4, PLC & Jacket 4 + 0 End plain
  - f) Binding -Hard bound with matt lamination, Head & Tail bands
  - g) Packing Individual shrinks wrap & master box packing.

## 2) माहितीपट (व्हिडिओ)

वनामती नागपूर तसेच इतर ७ रामेती संस्थांची संपूर्ण माहिती देणारे माहितीपट (व्हिडिओ)तयार करून प्रसारीत करण्याचा देखील संस्थेचा मानस आहे.

- यामध्ये प्रशिक्षण संस्थांचे उपलब्ध सोयी सुविधा,प्रशिक्षण पद्धती,प्रशिक्षण संस्थांमार्फत राबविण्यात येणारे विवीध उपक्रम इत्यादी बाबत माहिती देण्यात येईल.वनामती व रामेती प्रशिक्षण संस्थांचे (नागपूर,अमरावती,छत्रपती संभाजीनगर, नाशिक, पुणे,कोल्हापूर व खोपोली)परिपूर्ण माहिती जनसामान्यापर्यंत पोहोचण्याच्या दृष्टिकोनातून माहितीपट (व्हिडिओ) तयार करून ते संस्थेचे वेबसाईट (www.vanamati.gov.in), Facebook Page (Vanamati Nagpur) व YouTube Channel (VANAMATI NAGPUR)_ वर प्रसारित करण्याचा संस्थेचा मानस आहे. याकरिता आवश्यक असलेले फोटो व व्हिडिओ इत्यादी सेवा पुरवठादारांनी संबंधीत संस्थेमध्ये प्रत्यक्ष भेट देवून तयार करावयाचे आहे.

Technical Specifications

a) Video quality dynamic
b) Video length- 15-20 min
c) Use of High-Resolution photography
d) Script & commentary
e) Drone Shooting

## 3) वार्षीक प्रशिक्षण विशेषांक

वनामती व रामेती संस्थांचेस्तरावरून आयोजीत केलेल्या प्रशिक्षणांची फलनिष्पत्ती म्हणून प्रशिक्षीत अधिकारी/कर्मचारी यांचेडून त्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात केलेले उल्लेखनीय कार्याची यशोगाथा, काही नवीन प्रयोग राबवितांना आलेले अपयश व त्यातून मिळालेली शिकवण तसेच वैशिष्ट्यपूर्ण केलेले काम याबाबतचे लेख वनामती नागपूर चे **वार्षिक प्रशिक्षण विशेषांकातून** प्रकाशीत करण्याचे प्रस्तावीत आहे.

- हे वाचन साहित्य **वार्षिक प्रशिक्षण विशेषांक** अंदाजे १०० पृष्ठांचे असेल.
- या वाचन साहित्याच्या किमान १०० प्रति छापण्याचा संस्थेचा मानस आहे.
- या करता आवश्यक लेखी साहित्य वनामती संस्थेमार्फत उपलब्ध करून देण्यात येईल.
- या साहित्याचे निर्मितीकरिता लेखी साहित्याचे व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकारचे सहाय्य केले जाणार नाही.
- Technical Specifications
  - Paper Size- A4
  - Cover Page —(Jacket)- 2 (130 GSM Indian art Paper )
  - Inner Page - 60 GSM Maplitho Paper or News Glaze Paper
  - Colour Text- 4 Colour Offset (Heat set ) printing on Web
  - Binding

अपर संचालक

**वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार**

**व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नागपूर**